संशोधन आराखडा

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या विविध योजना व त्यांचा समाजावरील परिणाम एक अभ्यास- कालखंड - २०१४-२०१७ विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत सादर करण्याचा

संशोधकाचा प्राथमिक आराखड

संशोधक

स्वाती पंढरीनाथ बोकारे

संशोधन मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.पंजाब चव्हाण

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय नांदेड

जानेवारी 2018

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या विविध योजना व त्यांचा समाजावरील परिणाम एक अभ्यास- कालखंड - २०१४-२०१७ विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा

प्रस्तावना :-

भारतीय राजकारणाचा अभ्यास केला तर स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणावर कॉग्रेस पक्षाचे प्राबल्य असलेले निदर्शनास येते. कॉग्रेस पक्षाने केंद्र व राज्य सरकारमध्ये जास्तीत जास्त वेळेस सत्ता हस्तगत करण्यामध्ये यश मिळवले आहे. इतकेच नव्हे तर 1947 ते 1977 पर्यंत केंद्रामध्ये कॉग्रेस पक्षाचे एकहाती सत्ता होती. ब्रिटीशांनी 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली तेव्हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारा कॉग्रेस हा प्रमुख पक्ष होता. भारतीय राजकारणात पक्ष पद्धतीचा निकोप विकास व्हावा या दृष्टीने हा पक्ष विसर्जीत करण्याची सुचना म.गांधीनी केली होती. परंतू तत्कालीन कॉग्रेसमधील वरिष्ठ नेतृत्त्वाने ही सुचना फेटाळून लावून कॉग्रेस पक्षाचे विसर्जन करण्यास नकार दिला. स्वातंत्र्य लढ्यातील कॉग्रेस पक्षाचे योगदान लक्षात घेऊन 1952 मधील पहिल्या सार्वत्रीक निवडणूकात केंद्रात व राज्यात या पक्षाला निर्वीवाद बहूमत प्राप्त झ ाले. तसेच यानंतर झलेल्या इस. 1957, 1962, 1967, 1972 या ही निवडणूकात कॉग्रस पक्ष बहूमताने सत्तेवर आला. कॉग्रेस पक्षाच्या भारतीय राजकारणावरील मजबूत वर्चस्वामुळे भारतात प्रभावी विरोधी पक्षाची निर्मिती होण्यास अडथळे निर्माण झाले. परंतू सतत एकाच पक्षाकडे सत्ता असल्यामुळे या पक्षातील नेतृत्त्वात भ्रष्टाचार, अरेरावीपणा, अंतर्गत मतभेद, जनहिताकडे दुर्लक्ष इ. सारखे दोष निर्माण झाले. परिणाम स्वरुप कॉग्रेस मधील फूटीर गटाने व विरोधी पक्षाने एकत्र येऊन त्यांनी जनता पक्षाची स्थापना केली.

जनता पक्षाने 1977 च्या सार्वत्रिक निवडणूकात यश प्राप्त करून मोरारजी देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली 24 मार्च 1977 रोजी पहिले बिगर कॉग्रेसी सरकार केंद्रात स्थापन केले. परंतु सत्ता स्थापनेसाठी अनेक विचारांचे पक्ष एकत्र आले असल्यामुळे व त्यांच्यातील वैचारीक मतभिन्नतेमुळे जनता पक्षाचे सरकार जास्त काळ सत्तेवर राहू शकले नाही व 28 जुलै 1979 रोजी जनता पक्ष (धर्मनिरपेक्ष) यांनी कॉग्रेस पक्षाचा पाठिंबा घेऊन चरणसिंगाना पंतप्रधान पदाची शपथ दिली. परंतू चरणसिंगानाही आपला कार्यकाल पूर्ण करता आला नाही व 1980 च्या सार्वत्रीक निवडणूकात इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली कॉग्रेस (आय) ने पुन्हा एकदा सत्ता हस्तगत केली. या नंतर 1980 ते 1989 या कालखंडात भारतीय राजकाराणावर कॉग्रेस पक्षाने आपले वर्चस्व निर्माण केले व या वर्चस्वाला अहवान देण्यासाठी या वर्चस्वाविरोधात पुन्हा विरोधी पक्षाची एकी होऊन जनता दल (राष्ट्रीय आघाडीचे) सरकार 1989 मध्ये व्ही.पी. सिंग यांच्या नेतृत्वाखली स्थापन झाले. परंतू अल्पावधीतच या आघाडीत फूट पडून समाजवादी जनता पक्षाने कॉग्रेस पक्षाच्या पाठिंब्यावर चंद्रशेखर यांची पंतप्रधान पदी नेमणूक केली. चंद्रशेखर यांनाही आपला कालावधी पूर्ण करता आला नाही. 1991 च्या सार्वत्रीक निवडणूकीत पी.व्ही. नरसिंहरावच्या नेतृत्वाखाली

कॉग्रेस पक्षाने सत्ता हस्तगत केली. 1996 ला अटलबिहारी वाजपेयीच्या नेतृत्त्वाखाली 16 दिवसांसाठी भारतीय जनता पक्षाचे सरकार आस्तित्वात आले परंतू बहुमताच्या अभावी वाजपेयींना पायउतार व्हावले लागले. यानंतर अनुक्रमे एच.डी. देवेगौडा व इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्त्वाखाली 1996 ते 1998 पर्यंत जनता दल (संयुक्त आघाडी) चे सरकार स्थापन झाले.

सन 1998 च्या सार्वत्रिक निवडणूकात कॉग्रेस पक्षाला अहवान देण्यासाठी अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी इ. भा.ज.प. मधील वरिष्ठ नेत्याने इतर 12 समविचारी पक्षांना एकत्र घेऊन राष्ट्रीय लोकाशाही आघाडीची स्थापना केली. या निवडणूकात रा.लो.आ. ला बहूमत प्राप्त होऊन अटलबिहारी वाजपेयीच्या नेतृत्त्वाखाली 19 मार्च 1998 रोजी सरकारची स्थापना केली. या सरकारने 22 मे 2004 पर्यंत सत्तेवर राहुन आपला कार्यकाळ पूर्ण केला. सतत पाच वर्ष केंद्रात सत्ता निर्माण करणारे हे पहिले बिगर कॉग्रेसचे सरकार होते. म्हणजेच भारतीय राजकारणात प्रथमच कॉग्रेसला एक पर्यायी विरोधी आघाडी म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा उदय झाला. परंतू यानंतर झालेल्या 2004 व 2009 च्या सार्वत्रिक निवडणूकात कॉग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी कडून रा.लो.आ. ला पराभव स्वीकारावा लागला. मनमोहन सिंगाच्या नेतृत्त्वाखाली कॉग्रेस ने सतत 10 वर्षे सत्ता प्राप्त केली. परंतू भ्रष्टाचार, घटक पक्षाची गटबाजी, सतत सत्तेमुळे आलेला अरेरावीपणा इ. मुळे 2014 च्या सार्वत्रिक निवडणूकात जनतेने नरेंद्र मोदीच्या नेतृत्त्वाखालील भा.ज.प. प्रणीत लोकशाही आघडी निर्विवाद बहूमत प्राप्त करून दिले. या निवडणुकीत रा.लो.आ. ने लोकसभेत 543 पैकी 336 जागा जिंकल्या तर या जागा पैकी निवळ भा.ज.प. ने 280 व इतर घटक पक्षाने यात शिवसेना-18, तेलगू देशम पक्ष- 16, लोकजनशक्ती पार्टी-6, शिरोमणी अकाली दल-4, राष्ट्रीय लोक समता पार्टी-3 अपना दल-2 तर नागा पीपल्स फ्रट, नॅशनल पीपल्स पार्टी, स्वाभीमानी पक्ष, पी.एम.के व अखिल भारतीय एन.आर. कॉग्रेस यांनी प्रत्येक-1 जागा लोकसभेत प्राप्त केल्या आहेत.

2014 च्या सार्वत्रिक निवडणुकीत सबका साथ सबका विकास विकासाचा नारा देत स्पष्ट बहुमत प्राप्त करून राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने केंद्रात नरेंद्र मोदीच्या नेतृत्त्वाखाली सत्ता स्थापन केली. लोकांना निवडणूकीच्या जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी नरेंद्र मोदी सरकारने महिला, बालक, मागासवर्गीय घटकाबरोबरच औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इ. क्षेत्रात विविध योजनाची सुरूवात केली. या वरील योजनातील काही महत्त्वपूर्ण योजनांचा आढावा खालील प्रमाणे थोडक्यात घेता येईल.

1) बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना :-

ही योजना 22 जानेवारी 2015 रोजी हरियाणातील पानिपत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या हस्त सुरूवात झाली. बाल लिंगगुणोत्तर सुधारणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून

मुलीच्या सबलीकरणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने संबधित योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या आमंलबजावणीसाठी 2014-15 अर्थसंकल्पात 100 कोटींची तरतूद करण्यात आली. सुरूवातीला देशातील 100 जिल्ह्यामध्ये ही योजना सुरूवात करण्यात आली असून महाराष्ट्रातील 10 जिल्ह्याचा समावेश संबंधीत योजनेत करण्यात आला आहे.

या योजनेची ब्रॅन्ड ॲम्बॅसॅडर माधुरी दिक्षीत असून केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्रालय, मनुष्यबळ विकास मंत्रालय व आरोग्य मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमानाने त्या योजनेची सुरूवात करण्यात आली.

2) सुकन्या समृद्धी (खाते) योजना :-

बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेअंतर्गत या योजनेची सुरूवात 22 जानेवारी 2015 रोजी हरियाणातील पानिपत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते झाली. मुलीच्या उच्च शिक्षणाची आणि विवाह विषयक आर्थिक गरज भागविण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत 10 वर्षाखालील मुलींचे बॅंक खाते उघडण्यात येऊन एका वर्षात 1000 ते 1.5 लाखापर्यंतची रक्कम खात्यात भरण्यात येते. या योजनेअंतर्गत गुंतलेल्या रक्कमेवर केंद्र सरकारने वेळोवेळी ठरवलेला व्याज दर देण्यात येऊन मुलगी 21 वर्षाची झाल्यानंतर अथवा तिच्या लग्नाची तारीख यापैकी जो दिवस आधी येईल ती खात्याची मुदतपूर्ती असेल.

3) डिजिटल इंडिया :-

डिजिटल इंडिया या योजनेची सुरूवात भारताला समृद्ध अर्थव्यवस्थेत आणि डिजिटल सक्षम समाजात रुपांतरील करण्याच्या उद्देशाने ऑगस्ट 2014 ते 2018 पर्यंत या कालखंडासाठी निश्चित करण्यात आली आहे. विकासाचे 9 आधारस्तंभ पुरविणे हे या योजनेचे उद्दिष्टे आहे. यात ब्रॉडबॉड महामार्ग, सर्वासाठी मोबाईल कनेक्टीव्हिटी, सार्वजनिक ठिकाण इंटरनेट कार्यक्रम, ई-प्रशासन, ई-क्रांती, सेवांचा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पुरवठा, सर्वासाठी माहिती, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादके, रोजगारासाठी माहिती तंत्रज्ञान व अली हारवेस्ट प्रोग्राम हे त्या योजनेचे आधारस्तंभ आहेत.

4) स्वच्छ भारत अभियान :-

2 ऑक्टोंबर 2014 रोजी म.गांधीजीच्या 145 व्या जयंती दिनी दिल्लीमधील वाल्मिकीनगर मधून या योजनेची सुरूवात करण्यात आली. पूर्वीच्या निर्मल भारत अभियानाची पूनर्रचना करून या अभियानाची सुरूवात करण्यात आली. ग्रामीण स्वच्छ भारत अभियान हे केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणार असून शहरी स्वच्छ भारत अभियान हे केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाद्वारे राबविले जात आहे. 2019 पर्यंत म्हणजेच म.गांधीजीच्या 150 व्या जयंती पर्यंत देशातील स्वच्छतेची पातळी वाढवून संपूर्ण देश स्वच्छ करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत उघड्यावरील उत्सर्गाची पद्धत पूर्णपणे बंद करून लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जन जागृती वाढविणे, वैयक्तीक व सार्वजनिक शौचालय बांधण्यास प्रोत्साहन देणे, महानगरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणे इ. उद्देश ठेवण्यात आला आहे. यासाठी वैयक्तीक घरगुती शौचालय बांधण्यासाठीच्या अनुदानात वाढ करून ते 10,000 ऐवजी 12,000 रु. करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील खुले मलमूत्र विसर्जन संपविण्यासाठी ग्रामपंचायतीसाठी रु. 20 लाख रुपये वार्षिक अनुदान मंजूर करण्यात येईल. तसेच घनकचरा व्यवस्थपनाचा खर्च केंद्र व राज्याकडून उचलण्यात येईल इ. तरतूदी करण्यात आला आहेत.

5) जन औषधी योजना :-

1 जुलै 2015 पासून नवी दिल्लीत या योजनेची सुरुवात करून औषधाच्या वाढत्या किंमतीमुळे त्रस्त असणाऱ्या पेंशटसना दिलासा देण्याच्या उद्देशाने भारतीय औषधी विभागाने ही योजना सुरुवात केली आहे.

6) संसद / खासदार आदर्श ग्राम योजना :-

11 ऑक्टोंबर 2014 रोजी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या जयंती दिनी या योजनेची सुरूवात नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. प्रत्येक खासदाराने आपल्या मतदार संघातील 3 खेड्यांचा भौतिक व संस्थात्मक पायाभूत सुविधांचा विकास 2019 सालापर्यंत जबाबदारी घेवून सुशासन व वित्तीय समावेश तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी करावा या उद्देशाने ही योजना सुरुवात करण्यात आली आहे.

7) दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना :-

या योजनेची सुरुवात 2015 मध्ये करून यासाठी 75,600 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण भागात सतत विजपुरवठा करणे व प्रत्येक कुटूंबापर्यंत वीज पुरवण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे.

8) स्मार्ट शहर योजना :-

25 जून 2015 रोजी नरेंद्र मोदींच्या हस्ते शहरी भागात पायाभूत सुविधांची उणीव भरून काढण्यासाठी व गुंतवणूकीसाठी अनुकूल वातावरणाच्या निर्मितीसाठी ही योजना स्वीकारण्यात आली आहे. यासाठी सुरूवातीला 100 स्मार्ट शहराची निवड करुन त्याच्या विकासासाठी 48 हजार कोटींची तरतूद केली आहे.

9) पटल योजना :-

1 जानेवारी 2015 पासून ह्या योजनेची सुरुवात झाली. स्वयंपाकाच्या गॅसचे सरकारी अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या उद्देशाने थेट लाभार्थी हस्तांतरण योजनेअंतर्गत ही योजना राबवण्यात येणार आहे.

10) अटल पेंशन योजना :-

9 मे 2015 रोजी नरेंद्र मोदींच्या हस्ते या योजनेची सुरुवात होऊन असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ही योजना आहे.

11) प्रधानमंत्री उज्वला योजना :-

मार्च 2016 मध्ये या योजनेची सुरूवात होऊन दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील महिलेस स्वयंपाकाच्या गॅसचे मोफत कनेक्शन पुरविण्यासाठी या योजनेची सुरूवात करण्यात आली आहे.

12) प्रधानमंत्री जनधन योजना :-

28 ऑगस्ट 2014 रोजी माझे खाते भाग्यविधाते या ब्रिदवाक्याखाली या योजनेची सुरुवात करण्यात आली. देशातील प्रत्येक कुटूंबाला बँकींग व्यवस्थेशी जोडणी व त्यांना वित्तीय सुविधाचा लाभ मिळवून देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली.

13) मेक इन इंडिया :-

25 सप्टेंबर 2014 रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात पंतप्रधान मोदींच्या हस्ते या योजनेची सुरूवात करण्यात आली. देशांतर्गत उद्योगांना चालना मिळवून देणे व परकीय गुंतवणुकीसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण करणे, भारताला उत्पादन क्षेत्राचे जागतिक केंद्र बनविणे, भारतातील नामांकित कंपन्यांना जागतिक कंपन्यांच्या अग्रस्थानी नेण्याच्या उद्देशाने या योजनेची सुरूवात करण्यात आली.

14) स्टार्ट अप इंडिया योजना :-

15 ऑगस्ट 2015 रोजी या योजनेची घोषणा करून 16 जानेवारी 2016 रोजी योजनेस प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. स्टार्ट अप करणाऱ्यांसाठी 10,000 कोटींचा निधी उपलब्ध करून देऊन त्यांनी प्रोत्साहन देण्यासाठी 3 वर्षे आयकर सवलत देखील जाहीर केली आहे.

वरील योजनांचा थोडक्यात आढावा घेतला तर असे लक्षात येते की वरील योजना ह्या समाजातील सर्व सामान्य माणसांच्या जीवनाशी निगडीत अश्या योजना आहेत. या योजनांची अमंलबजावणीचा अभ्यास करून या योजनांचा एकुण समाजजीवनावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रस्तूत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन समस्या :-

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या विविध योजना व त्यांचा समाजावरील परिणाम एक अभ्यास-कालखंड 2014 ते 2017 (विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा)

संशोधन विषयाचे महत्त्व :-

स्वातंत्र्योत्तर काळाल प्रबळ विरोधी पक्षांच्या अभावी भारतीय राजकारणात केंद्रात व राज्यात कॉंग्रेसप्रणीत सरकारच मोठ्या प्रमाणावर अस्वित्त्वात आली. बहूमताच्या जोरावर व विरोधा अभावी सत्ता उपभोगताना भ्रष्टाचार, निष्क्रिय सरकार, जनविरोधी धोरणे, धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकडे दूर्लक्ष, मनमानी कारभार, मंत्र्याची आरेरावी यासारखे दोष कॉंग्रेस प्रणीत शासनात निर्माण झाले. या सर्वांवर उपाय व कॉग्रस पक्षाला पर्याय म्हणून 1998 मध्ये अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणीच्या पुढाकाराने समविचारी पक्षांनी एकत्र येऊन राष्ट्रीय लोकशाही आघाडीची स्थापना केली. 1998 व 2014 च्या सार्वत्रिक निवडणूकात या पक्षाने केंद्रात सत्ता हस्तगत केली. इतकेच नव्हे तर 2014 च्या सार्वत्रीक निवडणूकात या पक्षाने जनतेला विकासाचे आश्वासन देऊन केंद्रात निर्विवाद बहूमत करून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली सत्तेची प्रस्थापना केली.

रा.लो.आ. सरकाने 2014 च्या निवडणूकीच्या जाहिरनाम्यात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी केंद्रातील मोदी सरकारने विविध योजनांची सुरूवात केली आहे. या योजना शिक्षण, क्रिडा, आरोग्य, कृषी, तंत्रज्ञान या बरोबर बालक, युवक, महिला, मागासवर्गीय, व अल्पसंख्याक या विकासाशी निगडीत आहे. या योजनाची माहिती घेऊन ह्या योजनाच्या अमंलबजावणीमुळे समाज जीवनावर पडलेल्या परिणाम अभ्यास करण्यासाठी प्रस्तूत विषय संशोधन कार्यासाठी निवडला आहे. विविध शासकिय योजना हा समाजातील विभिन्न घटकांच्या विकासाशी निगडीत असतांत. तसेच योजनाच्या यशस्वीतेवरच तत्कालीन शासनाच्या कार्याचे यशस्वीतेचे मूल्यांकन केले जाते. त्या दृष्टीने संबंधित विषय महत्त्वपूर्ण आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1) स्वातंत्र्योत्तर काळातील केंद्रातील विविधसरकारांचा थोडक्यात अभ्यास करणे.
2) राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वाटचालीचा अभ्यास करणे.
3) केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातील विविध योजनाचा अभ्यास करणे.
4) राष्ट्रीय लोकशाही आघाडी ने निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या अश्वासनांच्या पुर्ततेचा अभ्यास करणे.
5) केंद्र सरकारच्या विविध योजनाच्या अमंजबजावणी विषयक माहितीचा अभ्यास करणे.
6) केंद्र सरकारच्या विविध योजनांचा नांदेड जिल्ह्यातील समाज जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
7) योजनांच्या पूर्ततेमुळे सामान्य लोकांच्या जीवनावर झालेल्या चांगले वाईट परिणाम तपासणे

संशोधन विषयाची गृहितके (Hypothesis of the sopic)

1) स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्यातील कॉग्रेस पक्षाच्या वर्चस्वामुळे विरोधीपक्षाच्या विकासास वाव मिळाला नाही.
2) भारतीय पक्षीय राजकारणात कॉग्रेस पक्षाला प्रभावी विरोधी पक्ष म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडी प्रभावीपणे कार्य करत आहे.
3) केंद्रशासनाने समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी विविध योजना कार्यान्वीत केल्या आहेत.
4) केंद्र सरकारच्या विविध योजनांची आमंलबजावणी प्रशासकीय व्यवस्थेकडून केली जात आहे.
5) केंद्र सरकारच्या विविध योजनांचा समाज जीवनावर सकारात्मक प्रभाव पडत आहे.

संशोधन पद्धती :- Research Method

प्रस्तुत संशोधन हे शास्त्रीय संशोधन पद्धतीवर आधारीत आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :- (Data collection)

प्रस्तुत संशोधन तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

1) प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोतामध्ये मुलाखत प्रश्नावलीचा आवलंब करण्यात येणार आहे.

2) दुय्यम साधणे :

दुय्यम साधनामध्ये तथ्य संकलनासाठी प्रकाशित, अप्रकाशित संदर्भ ग्रंथ विविध योजना, त्याच्या आमंलबजावणी विषयीचे अहवाल, संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झालेले लिखाण, वृत्तपत्रे, मासिके, त्रैमासिके, संकेतस्थळे इ. आधार घेण्यात येणार आहे.

नमुना निवड पद्धती :-

प्रस्तूत संशोधनासाठी गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. विविध योजनाचा समाजावरील परिणाम अभ्यासण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील 8 तालुक्याची निवड सहेतूकपणे करून योजनाच्या अमंलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी निवडलेल्या तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्याची मुलाखत घेण्यात येणार आहे. समाजावरील प्रभाव अभ्यासण्यासाठी लाभार्थी घटकांची निवड ही सहेतूकपणे करण्यात येणार आहे.

संशोधन व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या केंद्रातील 2014 ते 2017 दरम्यानच्या विविध योजनाचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच वरील योजनाचा समाज जीवनावरील परिणाम अभ्यासण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड अभ्यासासाठी करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात केवळ राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातील केंद्रातील 2014 ते 2017 दरम्यानच्याच विविध योजनांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या योजनांचा समाज जीवनावरील परिणाम अभ्यासण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात येणार आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरण आराखडा :-

कोणत्याही संशोधकापुढे संशोधन करतांना निश्चित स्वरुपाचे उद्दिष्ट असते. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते. ही मांडणी अतिशय आवश्यक व महत्त्वाची असते. कारण अशा पूर्व नियोजीत मांडणीमुळे संशोधन भटकत नाही व योग्य त्या निष्कर्षाप्रत संशोधन पोहचण्यासाठी मदत होते.

प्रकरणाची रुपरेषा :- Chapter Planning

1) प्रकरण पहिले - प्रस्तावना :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना करण्यात येईल. यात स्वातंत्र्योत्तर काळातील केंद्रातील विविध पक्षांच्या सरकारचा थोडक्यात आढावा घेण्यात येणार आहे. त्याच बरोबर संशोधन समस्येचे महत्त्व, विषयाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती आणि प्रस्तूत अभ्यासासंदर्भात पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेऊन संशोधन आराखड्याचे विवेचन करण्यात येणार आहे.

2) प्रकरण दुसरे :- राष्ट्रीय लोकशाही आघाडी ध्येय धोरणे आणि निवडणुक जाहीरनामा:

या प्रकरणामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीची स्थापना, त्यातील घटक पक्षाची माहिती, तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास करण्यात येणार आहे.त्याचबरोबर या अघाडीच्या ध्येय धोरणांचा अढावा घेउन निवडणूकीच्या दरम्याण दिलेल्या निवडणूक जाहिरनाम्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

3) प्रकरण तिसरे - राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या केंद्रशासणातील विविध योजना :

प्रस्तूत प्रकरणात राष्ट्रीय लोकशाही आघडी सरकारच्या केंद्रातील 2014 ते 2017 दरम्यानच्या विविध शासकीय योजनांचे विस्तृत विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - योजनांचा अमंलबजावणी :

या प्रकरणामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने घोषीत केलेल्या विविध योजनांच्या अमंलबजावणीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

5) प्रकरण पाचवे - योजनांचा नांदेड जिल्ह्याच्या समाज जीवनावरील परिणाम :

प्रस्तूत प्रकरणात केंद्र सरकारने राबविलेल्या विविध योजनाचा समाज जीवनावर पडलेल्या परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

6) प्रकरणा सहावे - निष्कर्ष व शिफारशी :

शोध प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातील विविध योजनाचा समाजावर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास करून आलेले निष्कर्ष व त्याबाबतच्या शिफारशी मांडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथसूची

1) डॉ. प्रदिप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रविद्या प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती जाने. 2000.
2) डॉ. पु.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती - 1987
3) डॉ. बा.भा. पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जवळगाव. सुधारित आवृत्ती - 2010.
4) बी.बी. पाटील, भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन. प्रथम आवृत्ती, ऑगस्ट - 1999.
5) प्रा. लांडगे पंडित शिवराम, भारतीय शासन आणि राजकारण, प्रथम आवृत्ती - 17 सप्टें. 2014.
6) डॉ. अलका देशमुख, भारतीय शासन आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती - 15 ऑगस्ट 2009.
7) संपादक- डॉ. पंडित नलावडे, भारतीय लोकशाही, चिन्मय प्रकाशन - 23 डिसें. 2011.
8) आलोककुमार- कॉग्रेस का इतिहास एवं कार्य, इशिका पब्लिशंग हाऊस, प्रथम संस्करण - 2012.

संशोधक विद्यार्थी

स्वाती पंढरीनाथ बोकारे

संशोधक मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.पंजाब चव्हाण

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

दिगंबरराव बिंदु महाविद्यालय,भोकर